JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ऐतिहासिक सामुग्री (माहिती ) संकलन पद्धती ;ब्वससमबजपवद व क्िंजंद्ध

प्रा.डॉ.महेंद्र गायकवाड
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग
डॉ.मधूकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड नागपूर

**सारांष; ।इजतंबद्ध :—** इतिहास लेखनाचा मुळ आधार ऐतिहासिक सामुग्री असते.प्रो.सेनबॉस यांनी असे म्हटले आहे की,छव कवबनउमदजे दव भ्पेजवतल म्हणजे कागदपत्रांषिवाय इतिहास नाही. ऐतिहासिक सामुग्रीतून मिळविलेल्या माहितीच्या आधारे इतिहास लिहिला जातो.संषोधकांनी सोयिस्कर ठरतील अषा ऐतिहासिक माहिती संकलन पद्धती सांगितल्या आहेत. संषोधकाला जर संकलन पद्धतीच्या गुणदोशांची कल्पना पूर्वीच असल्यास संषोधक आपल्या आवडीनुसार माहिती संकलन पद्धतीची निवड करू षकतो. त्यामुळे संषोधकांना येणाऱ्या अडचणी दूर होऊ षकतात. ऐतिहासिक सामुग्री संकलनाच्या सर्व पद्धतीची जाण संषोधकास असने गरजेचे आहे. संषोधनाचे स्वरूप विचारात घेऊन माहिती संकलनाची कोणती पद्धती उपयुक्त ठरेल? याचा अंदाज घेऊन संषोधकाने त्या संकलन पद्धतीने माहितीचे संकलन करावे.संषोधकाचा संषोधनाचा विशय काय?संषोधकाला त्याच्या संषोधन विशयाषी सबंधीत माहिती कोणत्या माहिती संकलनाच्या पद्धतीद्वारे प्राप्त होऊ षकते? याची पुर्व कल्पना असने आवष्यक असते.जनसमुहाची मते जानुन निर्णय करावयाचा असल्यास सर्वेक्षन पद्धतीचा उपयोग होतो.एखाद्या मंदीरावर संषोधन करावयाचे असल्यास अषावेळी निरीक्षण पद्धतीचा उपयोग होतो.

21 व्या षतकात इतिहासामध्ये नवनवीन साधने प्रकाषात येत आहेत. त्यात प्रामुख्याने मुलाखती, प्रसार माध्यमे (वृत्तपत्रे, रेडियो व दुरदर्षन), सर्वेक्षण, सार्वजनिक कागदपत्रे, खाजगी कागदपत्रे, संसदिय कागदपत्रे, प्रष्नावली आणि टिपणे तयार करण्याची पद्धती यांच्या विशयाची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल

**षब्दबीज** ;झमल ूवतकद्ध.**सर्वेक्षन, प्रष्नावली,,मुलाखत,प्रसार माध्यमे, सार्वजनिक कागदपत्रे, खाजगी कागदपत्रे, संसदिय कागदपत्रे, प्रष्नावली टिपणे, म्हणी आणि लोकगीते**

**प्रस्तावना :—**इतिहास लेखनाचा मुळ आधार ऐतिहासिक सामुग्री असते. ऐतिहासिक सामुग्रीतून मिळविलेल्या माहितीच्या आधारे इतिहास लिहिला जातो. डॉ. षांता कोठेकर लिहितात की, ''ऐतिहासिक माहिती विशयाची चौकट तयार करते. त्यात तपषिल भरते आणि इतिहासाला ग्रंथरूप देते.''[1].ऐतिहासिक स्त्रोत साधनाचे परिक्षण करीत असतांना सर्व माहिती स्मरणात ठेवणे षक्य नसते. संदर्भ ग्रंथातील सर्व माहिती स्मरणात ठेवणे अषक्य कोटीतील गोश्ट आहे. वर्तमान काळात स्त्रोत साधनांचे क्षेत्र विस्तारले असल्याने त्यांचा सर्व तपषिल स्मरणात ठेऊन इतिहास लेखनात संदर्भाचा योग्य ठिकाणी वापर करणे तारेवरची कसरत असते. संदर्भग्रंथांची नावे, त्यांच्या लेखकाची पूर्ण नावे, त्यांना पाना—पानावरील आषय, प्रकाषक, प्रकाषन वर्श आणि आवृत्ती क्रमांक हया सर्व माहिती लेखकाच्या हाताषी असल्यास लेखनकार्य सुकर होते

संषोधकांनी सोयिस्कर ठरतील अषा ऐतिहासिक माहिती संकलन पद्धती सांगितल्या आहेत. संषोधकाला जर संकलन पद्धतीच्या गुणदोशांची कल्पना पूर्वीच असल्यास संषोधक आपल्या आवडीनुसार पद्धतीची निवड करू षकतो. त्यामुळे संषोधकांना येणाऱ्या अडचणी दूर होऊ षकतात. ऐतिहासिक सामुग्री संकलनाच्या सर्व पद्धतीची जाण संषोधनाचे स्वरूप विचारात घेऊन माहिती संकलनाची कोणती पद्धती उपयुक्त ठरेल याचा अंदाज घेऊन त्या संकलन पद्धतीने माहितीचे संकलन करावे.

21 व्या षतकात इतिहासामध्ये नवनवीन साधने प्रकाषात येत आहेत. त्यात प्रामुख्याने मुलाखती, प्रसार माध्यमे (वृत्तपत्रे, रेडियो व दुरदर्षन), सर्वेक्षण, सार्वजनिक कागदपत्रे, खाजगी कागदपत्रे, संसदिय कागदपत्रे, प्रष्नावली आणि टिपणे तयार करण्याची पद्धती यांच्या विशयाची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल

.

## 1) सर्वेक्षण / निरीक्षण पद्धती

सर्वेक्षण इतिहास संषोधन प्रक्रियेचे महत्वाचे अंग होय. इतिहासाचे समकालीन साधन म्हणून सर्वेक्षणाचे महत्त्व आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहासाची सर्वेक्षण पद्धती मौल्यवान ठरते. सर्वेक्षण इतिहास संषोधन प्रक्रियेचे महत्त्वाचे अंग ठरू षकते. सर्वेक्षणात वस्तुनिश्ठता सांभाळली गेली पाहिजे. संषोधक हा मुलतः व्यक्तिनिश्ठ असल्याने बऱ्याच वेळा सर्वेक्षणाला मर्यादा पडतात. डॉ. बी. एन. सरदेसाई सर्वेक्षणाविशयी लिहितात की, ''इतिहासकाराने सर्वेक्षणामधील निश्कर्श टाळू नयेत तर योग्य परीक्षणानंतर त्याचा स्वीकार करावा. त्याचा इतिहासलेखनाला उपयोग होतो. इतिहासकाराचे मुलभूत कार्य एखादी घटना कषी घडली हे सांगणे आहे. त्या घटनेच्या स्पश्टीकरणासाठी जर एखादे सर्वेक्षण उपलब्ध असेल तर ते सर्वेक्षण नाकारण्याचे त्याला काहीच कारण नाही. उलट, त्याला त्या ऐतिहासिक घटनेचे स्पश्टीकरण करण्यास असे सर्वेक्षण उपयोगी पडेल.''[2] याचाच अर्थ असा की, सर्वेक्षणाद्वारा प्राप्त निश्कर्श इतिहासकाराने टाळू नयेत.

सर्वेक्षण पद्धतीचा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक हया तिन्ही कालखंडाचा अभ्यास करतांना उपयोग होतो. ज्या दिवषी संषोधन विशयाला माहिती मिळेल त्या स्थळी भेट देऊन तेथे सुक्ष्म निरीक्षण करून आवष्यक माहिती संषोधक गोळा करतो. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासाठी ही पद्धत विषेश उपकारक ठरते. सर्वेक्षणाद्वारे अनेक बाबींची माहिती गोळा करता येते. आधुनिक काळासाठी आणि प्रादेषिक इतिहास लेखनासाठी सर्वेक्षणाचा उपयोग होाते. डॉ. षांता कोठेकर सर्वेक्षणाविशयी लिहितात की, ''सर्वेक्षण करताना आवष्यक ती माहिती, स्थळ वैषिश्टये, संषोधकाने सुक्ष्म निरीक्षणाद्वारा नेमकी टिपावयाची असतात व त्यांची अचूक नोंद करून ठेवावयाची असते. यासाठी कुषाग्र बुद्धी व तिक्ष्ण व सुक्ष्म निरीक्षणाची गरज असते. तसेच गडबडीने घाईघाईने नोंदी न करता त्या अचूक व निर्दोष असणेही आवष्यक असते कारण हाच त्याचा पुरावा असतो.''[3]

सर्वेक्षण पद्धतीद्वारा प्राप्त माहितीचे संषोधकाला चिकित्सक विष्लेशण करावे लागते. काही सामान्य निश्कर्श काढावी लागतात. प्राप्त माहितीचे पृथक्करण करून समानता किंवा भेद दर्षविणारी माहिती मिळाली का? याचा विचार करूनच सामान्य निश्कर्श काढावे लागतात. संषोधनास सामुग्री संकलनासाठी सर्वेक्षण पद्धतीविशयी घ्यावयाच्या काळजी विशयी डॉ. षांता कोठेकर लिहितात की, अचुक निश्कर्श काढण्यासाठी सर्वेक्षण षक्यतो जास्तीत – जास्त व्यापक असावे लागते. निरीक्षणाचे तंत्र अवगत असावे लागते, वैषिश्टये नेमकी टिपण्याची आकलनषक्ती व सुक्ष्म दृश्टी असावी लागते. आणि टिपणे बिनचूक व मुद्देसुद असावी लागतात.''[4]

सर्वेक्षण या पद्धतीद्वारे षास्त्रषुद्ध माहिती प्राप्त करता येते. अनेक समस्या सोडविण्यासाठी ही पद्धती उपयोगी पडते. अनेक समस्यांवर सर्वेक्षणाद्वारे विविध उपाय सुचविले जातात. सर्वेक्षणा विशय प्रा. गफूर षेख लिहितात की, ''अषा सर्व सर्वेक्षणाचे रेकॉर्ड जतन करून ठेवले जाते असे सर्वेक्षण रेकॉर्ड इतिहासाचे समकालीन संदर्भ साधन म्हणून अत्यंत महत्त्वाचे असते. त्याचा इतिहास लेखन प्रणालीसाठी उपयोग होतो. सर्वेक्षणातील निश्कर्शांचा भुतकालीन घटना किंवा प्रसंग याचे स्पश्टीकरण करण्यासाठी उपयोग होतो. म्हणूनच इतिहासकार किंवा इतिहास संषोधक यांनी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक तसेच इतर अनेक प्रकारच्या सर्वेक्षणांचा काळजीपूर्वक उपयोग करून घेतला पाहीजे. सर्वेक्षणातील निश्कर्श स्वीकारले पाहिजे म्हणजे त्यामुळे वस्तुनिश्ठ व पारदर्षी स्वरूपाचे इतिहासलेखन करता येईल.''[5]सर्वेक्षण या पद्धतीद्वारे योग्य ती काळजी घेऊन माहिती प्राप्त केली तर सर्वेक्षण हे इतिहासाचे महत्त्वाचे संदर्भ साधन ठरू षकते.

## 2) प्रष्नावली पद्धती

महिती संकलनाच्या सर्वेक्षण पद्धतीत येणाऱ्या व्यावहारिक अडचणी प्रष्नावली पद्धतीचा उपयोग करून सोडविता येते. माहिती संकलनाच्या प्रष्नावली पद्धतीविशयी डॉ. षांता कोठेकर लिहितात की, प्रष्नावली पद्धतीचा वापर प्रामुख्याने आधुनिक काळातील, विषेशतः समकालीन माहिती संकलनासाठी होतो. नुकत्याच घडून गेलेल्या घटनांविशयी, नजीकच्या गतकाळातील चळवळींच्या विशयी अगर व्यक्तिंच्या कार्यांविशयी, तसेच निवडणूकांबाबत लोकमताचा अंदाज घेण्यासाठी वगैरे प्रष्नावलीचा उपयोग होतो.''[6]

प्रष्नावलीद्वारा अचूक व समर्पक माहिती मिळविण्यासाठी ती अतिषय काळजीपूर्वक तयार करावी लागते. प्रष्नकर्त्याला, माहितीसाठी भिन्न स्थळी असलेल्या अनेक व्यक्तींकडून हवी ती माहिती मिळवण्याचा प्रष्नावलीचा हेतू असतो. माहिती मिळविण्याचा हेतू योग्य प्रकारे सिद्ध होण्यासाठी ज्या मुद्यांबाबत माहिती हवी आहे व ती कोणाकडून मिळू षकेल याचा पूर्वविचार संषोधकाने करावा लागतो संषोधनाच्या गृहितकाचा विचार पक्का करून त्याच्या कोणत्या पैलूसंबंधी माहिती कोणाकडून मिळू षकते या निर्णयावर प्रष्नावलीचा यषस्वी वापर होऊ षकतो.

प्रष्नावलीची विभागणी दोन भागात करावी लागते. पहिल्या भागात उत्तरदात्याची वैयक्तिक माहिती, त्याचे नाव, पत्ता, वय, व्यवसाय, षिक्षण इत्यादीबाबत प्रष्न असतात. वय, व्यवसाय, षिक्षण यावरून माहिती देणाऱ्याची पात्रता कळू षकते. उत्तरदात्याने खुलेपणाने उत्तरे द्यावीत यासाठी प्रष्नांचे स्वरूप वस्तुनिश्ठ असावे लागते. प्रष्नावलीच्या दुसऱ्या भागात विशयासंबंधीचे प्रष्न मुद्देसुद व काटेकोर असावेत. प्रष्नावलीतील प्रष्नांच्या स्वरूपाविशयी डॉ. षांता कोठेकर लिहितत की, प्रष्नांच्या क्रमात मुद्दांची सरमिसळ होणार नाही अषी दक्षता घेणे आवष्यक असते. प्रष्नांचे स्वरूप स्पश्ट असावे ते गोंधळात टाकणारे असू नयेत. तसे असल्यास नेमकी उत्तरे मिळणार नाहीत. एका प्रष्नावलीत भिन्न मुद्यांवर माहिती अपेक्षित असल्यास प्रष्नांची भिन्न गटात वर्गवारी करता येत. दिलेल्या उत्तराचा दुरूपयोग प्रष्नकर्ता करणार नाही असा विष्वास उत्तरदात्यास असल्यास उत्तरे मोकळेपणे दिली जातात. म्हणून माहिती मिळविण्याच्या प्रष्नकर्त्यांचा उद्देष स्पश्ट करण्याची खबरदारी त्याने घेणे आवष्यक असते.''[7]

प्रष्नावलीतील प्रष्न दोन पर्यायी असू षकतात उत्तर कसे द्यायचे याची मुभा उत्तरदात्याला असली तर उत्तरे मोकळेपणाने प्राप्त होतात. केवळ उत्तरदात्यांचे मत जाणून घ्यायचे असेल तर पर्यायी उत्तरे नमुद करणे सोईचे ठरते. विस्तृत उत्तरांकरिता खुली उत्तरे मागविणे सोईचे ठरते. प्रष्नावलीत सर्व उत्तरदात्यांकडून माहिती भरून येईल याची षक्यता नसते. त्याचा पाठपूरावा करावा लागतो. उत्तरदात्यांनी दिलेली उत्तरे संदिग्ध असतात. त्यामुळे माहिती मिळविण्याच्या दृश्टीने निरूपयोगी ठरतात. उत्तरदात्याकडून मिळालेल्या माहितीचे पृथक्करण, वर्गिकरण व विष्लेशण हया प्रक्रिया संषोधकाला कराव्या लागतात. माहितीचे विष्लेशण व वर्गिकरण केल्यानंतर त्यातून निश्कर्श काढून पुरावा म्हणून वापर संषोधक करू षकतो.

### 3) मुलाखत

मुलाखत म्हणजे तोंडी पद्धतीने संदर्भ साधन जमविण्याचा मार्ग होय. व्यक्तीचे ऐतिहासिक चित्र समाजापुढे उभे करण्यास मुलाखत हे एक महत्त्वाचे तंत्र आहे. मुलाखत दोन प्रकारची असते. अकारिक मुलाखत आणि मुक्त मुलाखत दोन प्रकारची असते. अकारिक मुलाखतमध्ये पूर्व नियोजित, साचेबंद प्रष्न विचारले जातात त्यामुळे उत्तरे साचेबंद असतात. पर्यायी प्रष्नांची पर्यायी उत्तरे असतात. पर्याय होय, नाही अषा स्वरूपाचे असतात.

मुक्त मुलाखतीमध्ये कोणत्याही पूर्व नियोजनाषिवाय प्रष्न विचारले जातात. अषा प्रष्न उत्तरामध्ये प्रमाणबद्ध प्रतिसादाची अपेक्षा नसते. या प्रकारात उत्तरदाता कोणते उत्तर देईल याविशयी निष्चित सांगता येत नाही. मुक्त मुलाखत तंत्रामध्ये मुलाखतकार आपला विशय व तंत्रामध्ये निश्णात असावा लागतो. उत्तरदात्यांकडून उत्तरे काढून घेण्याची क्षमता असली पाहिजे. डॉ. बी. एन. सरदेसाई मुलाखत घेतांना घ्यावयाच्या काळजीविशयी लिहितात की, ''मुलाखत केव्हा घ्यावी याचा पूर्ण विचार करूनच मुलाखत घ्यावी. एकदम घाई गडबडीने मुलाखत घेऊ नये. कोणत्या व्यक्तीकडून आपल्याला कोणती माहिती मिळू षकेल याचा अंदाज घ्यावा.''[8]

मुलाखत घ्यावयाच्या व्यक्तींची यादी तयार करून विचारावयाच्या प्रष्नांचे गट तयार करावे. व्यक्ती ज्या व्यवसायामधील असेल त्या व्यवसायाचा त्याच्या मनोवृत्तीवर प्रभाव पडतो. मुलाखतीच्या मानसषास्त्राचा आधार घ्यावा. मुलाखत उत्तरदात्याच्या सोईच्या ठिकाणी घेतल्यास तो अधिक उत्साहाने माहिती देतो. डॉ. बी. एन. सरदेसाई मुलाखतीचे फायदे सांगतांना लिहितात की, ''1) कागदपत्रांमध्ये नसलेली जादा माहिती मुलाखतीमुळे मिळू षकते. 2) मुलाखतीच्या तंत्राने व्यक्ती आणि प्रसंग यांचा अन्वयार्थ लावणे सोपे जाते. 3) मुलाखतीच्या आधारे उपलब्ध कागदपत्रांचा अर्थ लावणे सोपे जाते.''[9]

मुलाखत तंत्र जर पूर्व तयारी आणि नियोजन करून घेतली गेली तर मुलाखतीचे फलित लाभदायक ठरते. डॉ. षांता कोठेकर लिहितात की, ''मुलाखतीत प्रष्नकर्ता व उत्तरे देणारा समोरा समोर असल्यामुळे अधिक माहिती मिळू षकते. या दृश्टीने मुलाखत पद्धती लाभदायक ठरते.''[10] मुलाखत पद्धती लाभदायक ठरत असली तरी मुलाखत जिवंत व्यक्तीचीच घेता येते. पडद्याआड गेलेल्या व्यक्तिंची मुलाखत घेता येत नाही त्यामुळे समकालीन बाबींची माहिती मिळविण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते. महान व्यक्तींच्या चरित्र ग्रंथासाठी अनेकदा मुलाखत घ्यावी लागतात. संषोधनात प्रत्यक्ष सहभागी व्यक्ती, अप्रत्यक्ष संबंधीत व्यक्ती, त्रयस्थ व्यक्ती आणि समकालीन व्यक्तींच्या मुलाखती उपयुक्त ठरतात. मुलाखत घेणे हे एक तंत्र अजून ते तंत्र कौषल्याने हाताळले तर ती फलदायी ठरते. मुलाखतदात्याची परिपूर्ण माहिती असल्यास सुसंवाद होण्यास मदत होते. त्यामुळे मुलाखत फलदायी ठरते. मुलाखतदाराच्या आवडी–निवडी माहित असल्यास मोकळा संवाद

षक्य होतो. मुलाखतदाराला विशय पूर्व सूचना दिल्यास जास्त माहिती मिळविता येते. मुलाखतदाराला साधे आणि सोपे प्रष्न विचारल्यास उत्तरे मुद्देसुद प्राप्त होते. जास्तीत जास्त माहिती मिळविण्यासाठी प्रष्नकर्त्यांने आपले बौद्धीक कसब वापरावे. प्राप्त माहिती पुरावा म्हणून वापरता येते.

गतकाळातील व्यक्ती व घटनांविशयी मुलाखत उपयोगी पडत नाही. मुलाखतदाराने दिलेले उत्तर निसदिग्ध असेल असे मानता येत नाही त्यामुळे माहितीची विष्वसनियता पडताळून पाहावी लागते. मुलाखत तंत्राविशयी प्रा. गफूर षेख लिहितात की, ''आधुनिक काळात एखाद्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील समस्येच्या संदर्भात त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जातात समस्यांच्या विशयी त्यांची मते जाणून घेतली जातात अषा मुलाखती वृत्तपत्रातून छापून येतात. रेडिओ आणि दुरदर्षनवरून त्या प्रसारीत केल्या जातात अषा प्रयीकेतून तज्ञाची एखाद्या समस्येविशयी किंवा घटनेविशयीची मते प्रभावीपणे जनतेपुढे मांडता येतात त्यामुळे मुलाखत तंत्रास आधुनिक युगात महत्त्व प्राप्त झालेले आहे. ''[11]

## 4) प्रसार माध्यमे (वृत्तपत्रे, रेडियो व दुरदर्षन)

वर्तमानकाळात प्रसार माध्यमात क्रांती झालेली आहे. माहिती व तंत्रज्ञानामुळे सर्व जगाला एका राश्ट्राचे स्वरूप आले आहे. प्रसार माध्यमांच्याद्वारे विविध कार्यक्रम प्रसारीत केले जातात. त्यातील अनेक माहितीपट असतात. मनोरंजन पर स्वरूपाचे सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा प्रसारीत केले जातात. बातम्यामधून घडामोडींचा वृत्तात सांगितला जातो. प्रा. गफूर षेख लिहितात की, ''प्रसार माध्यमांमुळे इतिहास संषोधनासाठी व इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरतील अषी अस्सल समकालीन नवनवीन साधने प्रचारात येत आहेत या अत्याधुनिक दर्जाच्या संदर्भ साधनांचा वापर करून खरोखरीच आपणास आधुनिक युगाचा इतिहास वास्तववादी स्वरूपात लिहिता येईल असा इतिहास जास्तीत–जास्त वस्तुनिश्ठ व पारदर्षी असेल. ''[12] याचा अर्थ असा की आधनिक संदर्भ साधनांचा वापर करून वास्तववादी इतिहास लिहिता येऊ षकतो. एखादी घटना किंवा प्रसंगाचे अनेकांतवादी दृश्टीकोनातून इतिहास लेखन झाल्यास इतिहास एकांगी व व्यक्तिनिश्ठ नसणार. प्रसार माध्यमामुळे अषा प्रकारचे इतिहास लेखन करणे षक्य होईल. लिहिलेला इतिहास एकांगी असणार नाही. वर्तमान काळातील पत्रकारिता कोणत्या तरी राजकीय पक्षाला वाहून घेणारी असल्याने त्यांच्या बातमीपत्रावर विष्वास ठेवणे सहज षक्य होत नाही.

## 5) सार्वजनिक संदर्भसाधने

सार्वजनिक व्यक्तीनी लिहिलेली, सार्वजनिक उपयोगांसाठी असणाऱ्या कागदपत्रांना सार्वजनिक संदर्भसाधने म्हणतात. ही कागदपत्रे ठेवण्यासाठी ज्या षासकिय इमारतीचा उपयोग केला जातो. त्याला पुराभिलेखागार ;।तबीपअमेद्ध म्हणतात. डॉ. बी. एन. सरदेसाई पुराभिलेखागार विशयी लिहितात की, आर्कईव्हज म्हणजे कागदपत्रे, निवडक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे ठेवण्याची जागा होय.''[13]

पुराभिलेखगारची काही वैषिश्ट्ये आहेत.

1) सरकारी खात्यांमध्ये महत्त्वाची कागदपत्रे बाजूला, सुरक्षित काढून ठेवण्याची पद्धत आहे.
2) आर्कईव्हजमध्ये ठेवलेली कागदपत्रे निश्पक्षपातीपणाने ठेवलेली असतात. त्यांचा वापर संषोधकाने स्वतःच्या अभ्यासासाठी करावा.
3) आर्कईव्हजमधील कागदपत्रे इतिहास संषोधकालाच नाही तर अभ्यासू व्यक्ती, सरकारी अधिकारी आणि षासनाला उपयुक्त ठरते.
4) आर्कईव्हजमधील कागदपत्राचे रजिस्टर असते, त्यामध्ये त्यांची नोंद असते व ती त्या ठिकाणीच पाहावयाची असतात.

सार्वजनिक कागदपत्रांमध्ये वृत्तपत्रे, मासिके, परिपत्रके, प्रवास वर्णने एखाद्या संस्थेची कागदपत्रे इत्यादी अनेक कागदपत्रांचा समावेष केला जातो. प्रा. गफूर षेख लिहितात की, ''अषा कागदपत्रातून भुतकालीन समाज जीवनाचे दर्षन होते. समाजाचा सामाजिक व षैक्षणिक विकास कसा झाला. या सांस्कृतिक विकासाविशयी माहिती मिळते. अषा सार्वजनिक कागदपत्रांचा आधुनिक युगाचा इतिहासा लिहिण्यासाठी अस्सल संदर्भसाधन म्हणून उपयोग होतो.''[14]

सार्वजनिक संदर्भ साधने जगभर विखूरलेली आहेत. महाराश्ट्रात मुंबईसह इतर अनेक ठिकाणी अषी पुराभिलेखागारे आहेत. त्यामध्ये डायरी, आवकपत्रे, जावकपत्रे कोर्ट ऑफ डायरेक्टरकडून आलेल पत्रे, सिक्रेट ॲण्ड पोलिटिकल डिपार्टमेंट अषा षिर्शकाखाली पत्रे आहेत. त्यांचा उपयोग इतिहास संषोधनासाठी होतो.

## 6) खाजगी कागदपत्रे

आधुनिक युगात समाजामध्ये कर्तबगार व थोर व्यक्ती झालेल्या असतात. अषा थोर व्यक्ती स्वतःचे आत्मचरित्र लिहित असतात. काही व्यक्ती दैनंदिन घडामोडीची नोंद ठेवणारी रोजनिषी लिहितात अषा थोर व्यक्तिंचा खाजगी स्वरूपाचा पत्रव्यवहार असतो. काही व्यक्ती आपल्या जीवनातील आठवणी लिहून ठेवतात अषी ही सर्व संदर्भ साधने खाजगी कागदपत्रे

म्हणून ओळखली जातात. प्रा. गफूर षेख लिहितात की, ''अषा कागदपत्रांच्या आधाराने आपणास भुतकालीन काही घटना व प्रसंग यांच्याविशयी माहिति मिळविता येते परंतु अषा कागदपत्रांचा संदर्भ साधने म्हणून उपयोग करतांना काळजपूर्वक उपयोग करावा लागतो.''[15]

इतिहासाच्या जडण–घडणीत कर्तबगार व्यक्तींचा मोठा सहभाग असतो. खाजगी कागदपत्रे संदर्भ साधनांच्या स्वरूपात महत्त्वाची असतात. खाजगी कागदपत्रांमध्ये रोजनिषी, पत्रव्यवहार, आठवणी इ. स्वरूपात असतात. थोर किंवा कर्तबगार व्यक्ती त्यांच्या जीवनातील घटना प्रसंग याविशयीची नोंद ठेवत असतात. अषी कागदपत्रे खाजगी स्वरूपाची, वैयक्तिक असतात. अषा प्रकारची कागदपत्रे भावीकाळात कोणीतर यावरून इतिहास लिहिल असा हेतू ठेवून लिहलेली नसतात. थोर किंवा कर्तबगार व्यक्तीला जे अनुभव आले त्याचे चित्रीकरण खाजगी कागदपत्रांमध्ये असते. राजकीय व्यक्तींच्या पत्रव्यवहारामध्ये त्याने आपल्या घरच्या माणसांना लिहिलेली पत्रे असतात. पक्ष कार्यकर्त्यांषी केलेला पत्रव्यवहार असतो पक्षाची ध्येय धारेणे ठरविणारी पत्रे अषा पत्रव्यवहारात असतात. बऱ्याच लोकांना रोजनिषी लिहिण्याची सवय असते. अषा रोजनिषीत त्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांची नोंद असते. थोर व्यक्ती ज्याप्रमाणे आपला पत्रव्यवहार जपून ठेवतात त्याचप्रमाणे विविध संस्था आपली कागदपत्रे जपून ठेवतात रेल्वे, बँका कागदपत्रे जपून ठेवतात.

खाजगी कागदपत्रांची मालकी त्या व्यक्तीच्या वारसाकडेच असते. अषी खाजगी कागदपत्रे संषोधनासाठी देणे न देणे त्या व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून असते. डॉ. बी. एन. सरदेसाई लिहितात की, ''अषा प्रकारे खाजगी कागदपत्रे हे जरी इतिहासाचे संदर्भ साधने असले तरी त्याचा वापर अतिषय काळजीपूर्वक करावा लागतो.''[16]

### 7) संसदिय कागदपत्रे

संसद देषाच्या राज्यकारभाराचा आरसा असतो. संसदेमध्ये लोकनिर्वाचीत प्रतिनिधीमार्फत कामकाज केले जाते. संसदेचे कामकाज चार प्रकारचे असते. प्रतिनिधित्वासंबंधी कामकाज, अर्थविशयक कामकाज, कायदे विशयक कामकाज आणि न्यायदान विशयक कामकाज. संसदेमध्ये प्रत्येक विशयावर चर्चा करून निर्णय घेतला जातो. चर्चा करूनच विधेयक पास करायचे की करायचे नाही हे ठरविले जाते. महत्त्वांच्या विधेयकाबाबत जनतेकडून सूचना मागितल्या जातात. त्या सुचनांचा विचार केला जातो. प्रा. गफूर षेख लिहितात की, ''विधेयक मांडण्यापासून तर पास करेपर्यंतचा सर्व पत्र व्यवहार हा संसदीय कामकाजाची कागदपत्रे म्हणून ओळखला जातो. त्याची वर्गवारी करून ठेवली जाते. त्यामध्ये व्होट बंडल, मिनिटस्, ऑफिषियल रिपोर्ट, स्टँडिंग कमेटी रिपोर्ट, लोकसभा – राज्यसभा या सभागृहातील कागदपत्रे, कॉमन प्रोसिडिंग्ज, ॲन्यूअल रिपोर्टस, डिपार्टमेंटल एन्क्वायरी पेपर्स, ग्रिन पेपर्स अषी अनेक प्रकारची कागदपत्रे असतात.''[17]

संसदीय कामकाजाच्या कागदपत्राच्या माध्यमातून एखाद्या देषाचा इतिहास लिहिता येतो. ही कागदपत्रे विष्वसनिय स्वरूपाची असतात त्यांचा इतिहासाची समकालीन संदर्भ साधने म्हणून उल्लेख केला जातो.

ब्रिटिष पार्लमेंटप्रमाणे भारतामध्येसुद्धा बिल पहिल्या वाचनाच्या आधी छापून जनतेच्या माहितीसाठी वाटले जाते. त्या वाचून त्यावर जनतेच्या येणाऱ्या सुचनांचा विचार केला जातो. हा सर्व पत्रव्यवहार स्टँडिंग कमेटी, स्पेषल स्टँडिंग कमिटी व सिलेक्ट कमिटीपुढे जातो त्यावर चर्चा होते याची नोंद पार्लमेंटरी कागदपत्रांमध्ये केली जाते. पार्लमेंट कर आकारणी करते. त्या संबंधीचे सर्व कागदपत्रे पार्लमेंटपुढे येतात. त्यावर चर्चा होते. चर्चेची नोंद ठेवली जाते. अर्थमंत्री पार्लमेंटमध्ये अंदाजपत्रक मांडण्यापूर्वी देषाचे आर्थिक सर्वेक्षण संसदेपुढे ठेवतो त्यावर चर्चा होते. ते विधेयक पास होते ही सर्व माहिति पार्लमेंटरी पेपर्समध्ये असते.

### 8) टिपणे पद्धती

ऐतिहासिक माहितीचे संकलन करण्यासाठी इतिहास विशयासाठी टिपणे तयार करण्याची पद्धती वापरली जाते. लिखित साधनांचे वाचन करतांना आवष्यक वाटणारे मुद्दे लक्षात ठेवणे कठीण असते. संदर्भ साधनांचे वाचन करतांना काही मुद्दे महत्त्वाचे वाटतात काही मुद्दे अन्वयार्य लावतांना महत्वाचे वाटतात त्याची नोंद हाताषी असणे आवष्यक असते. संकलित माहिती संषोधकाला पुरावा म्हणून उपयोगात आणता येतो. ही सर्व माहिती लक्षात ठेवण्याची कसरत करण्याऐवजी त्याच्या पद्धतषीर नोंदी केल्यास संषोधन कार्य सुकर होते.

टिपणे काढण्यासाठी मोठ्या आकाराच्या वहीत रजिस्टरमध्ये टिपणे घेणे. भिन्न ग्रंथांची टिपणे संषोधन विशयाच्या भिन्न पैलूंच्या आधारे घेणे. टिपणे सुट्या कागदावर घेऊन ती नंतर टाचून ठेवणे आणि टिपणे कार्डवर घेणे. ह्या चार पद्धतीवर टिपणे काढली जातात. डॉ. षांता कोठेकर लिहितात की, ''आवष्यक ते संदर्भ ग्रंथ / अगर मुळ कागदपत्रे वाचून पद्धतषीपणे टिपणे तयार करून त्यांचे वर्गीकरण आवष्यक त्या पद्धतीने केले की अभ्यास विशयाचा आराखडा तयार होतो. '' यानंतर मुळ साधनांची विष्वसनियता पडताळून पाहणे आणि त्यानंतर संकलीत विष्वासार्य माहितीची कारणमिमांसा करून त्याचा अन्वयार्थ लावावा लागतो.

**9) म्हणी आणि लोकगीत**

म्हणी आणि लोकगीत कधी–कधी एक म्हत्वपूर्ण स्त्रोत सामग्री सिद्ध होते कारण ते कथेच्या नायकाची स्पश्ट रूपरेशा दाखवित असतात. त्यांचे गंभिरपणे अभ्यास केला जातो. मराठ्यांच्या इतिहासात गड आला पण सिंह गेला या म्हणीतून छत्रपती षिवाजी महाराजांचा सिंहासारखा डरकाळी फोडणारा मावळा गेला. तो मावळा किती महत्त्वाचा होता याचा प्रत्यय या म्हणीतून येत असतो. अनेक लोकगितांमधून त्या त्या काळातील परिस्थितीचे दर्षन होते. त्यामुळे अषा म्हणी व लोकगीते इतिहासातील माहिती संकलनाचे एक चांगले साधन आहे.

**10) मुल्यमापन**

संदर्भ साधने हा इतिहासाचा आत्मा असतो. साधनाषिवाय इतिहास लिहिणे षक्य नाही. इतिहास लेखन करीत असतांना कोणत्या साधनामुळे इतिहास हा सत्यनिश्ठ आणि आणि जास्तीत–जास्त वस्तुनिश्ठ होईल व पारदर्षक होईल अषी साधने त्यासाठी निष्चित केली पाहिजेत. निवडली पाहिजेत म्हणजे इतिहास लेखन वस्तुनिश्ठ स्वरूपात करता येईल अषा वस्तुनिश्ठ स्वरूपाच्या इतिहासाचा उपयोग भावी पीढीसाठी मार्गदर्षक ठरेल. इतिहासात कल्पकतेला अजीबात वाव नाही इतिहास चिकित्सकपणे लिहिण्यात आला पाहिजेत इतिहासाला जर षास्त्राचा दर्जा मिळवून द्यायचा असेल तर संदर्भ साधनांची चिकित्सा करून त्याचे महत्त्व प्रतिपादन केले पाहिजे. संदर्भ साधने ऐतिहासिक कसोटीवर टिकत नसेल तर अषा अर्थहीन कागदपत्रांचा इतिहास लेखनात काहीच महत्त्व नसते. संदर्भ साधने ही अस्सल आणि बोलकी असायला पाहिजे.

**<u>संदर्भग्रंथसूची</u>**

1) कोठेकर डॉ. षांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृश्ठ क्र. 73
2) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाषन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृश्ठ क्र. 27
3) कोठेकर डॉ. षांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृश्ठ क्र. 74
4) कित्ता पृश्ठ क्र. 75
5) षेख प्रा. गफूर, इतिहास लेखन षास्त्र, प्रितम पब्लीकेषन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृश्ठ क्र. 121
6) कोठेकर डॉ. षांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृश्ठ क्र. 75
7) कित्ता पृश्ठ क्र. 75 व 76
8) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाषन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृश्ठ क्र. 25
9) कित्ता पृश्ठ क्र. 25
10) कोठेकर डॉ. षांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृश्ठ क्र. 76
11) षेख प्रा. गफूर, इतिहास लेखनषास्त्र, प्रितम पब्लीकेषनन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृश्ठ क्र. 120
12) कित्ता पृश्ठ क्र. 121
13) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाषन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृश्ठ क्र. 28
14) षेख प्रा. गफूर, इतिहास लेखनषास्त्र, प्रितम पब्लीकेषनन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृश्ठ क्र. 122
15) कित्ता पृश्ठ क्र. 123
16) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाषन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृश्ठ क्र. 30
17) षेख प्रा. गफूर, इतिहास लेखनषास्त्र, प्रितम पब्लीकेषनन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृश्ठ क्र. 122